# कोंबड्यांना परजीवींमुळे होणारे रोग





कोंबड्यांना परोपजीवीमुळे विविध रोग होतात. या रोगांमुळे अंडी देणाऱ्या पक्ष्यांमध्ये अंड्याची संख्या कमी होते, अंड्याचे कवच पातळ होते, मांसल पक्ष्यांच्या वजनात घट होते. अतिप्रादुर्भावामुळे पक्ष्यांची मरतूक होण्याची शक्यता असते.

## चपटे कृमी

पाण्यात आढळणाऱ्या गोगलगायी, ड्रॅगन माशी यामुळे या रोगाचा प्रसार होतो. बाधित पक्षी पातळ कवचाची अंडी देतात. त्यांच्या गुदद्वारातून दुधासारखा स्त्राव बाहेर पडतो. पक्षी अशक्त बनतात, तुरे जांभळी पडतात, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गोगलगायी व ड्रॅगन माश्यांवर नियंत्रण ठेवावे. पोल्ट्रीफार्म स्वच्छ ठेवावा.

## पट्टकृमी

तांदळाच्या कण्याप्रमाणे दिसणाऱ्या या कृमीचा प्रसार माश्या, मुंग्या, गोगलगायी, गांडूळ व इतर किड्यांमुळे होतो. कृमीची बाधा झालेले पक्षी अशक्त बनतात, पंख गळून पडतात, हगवण लागते, डोक्यावरील आवरण निस्तेज बनते, तसेच पायांचा पक्षाघात, लहान आतडयात गाठी निर्माण होणे व आंत्रदाह इत्यादी लक्षणे दिसतात.

## गोलकृमी

या कृमीचा प्रसार अस्वच्छ पाणी, दूषित खाद्य व गांडूळ यांच्याद्वारे होतो. अशक्तपणा, हगवण, अंडी उत्पादनात घट इत्यादी लक्षणे दिसतात, तसेच इतर रोगांचा प्रसार गोलकृमीद्वारे होतो. बाधित पक्षी बऱ्याच वेळेला पंडुरोगाला बळी पडतात, तसेच श्वसननलिकेतील गोलकृमीच्या प्रादुर्भावामुळे पक्ष्यांचा आवाज बदलतो. रोगावर द्राव्य व पावडर स्वरूपात औषधी उपलब्ध आहेत. पावडर स्वरूपातील औषधी मोठ्या पक्ष्यांना खाद्यातून व लहान पक्ष्यांना मात्र निम्मी करावी. औषध मात्रा तज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावी. जंतबाधा होऊ नये म्हणून खुराडे स्वच्छ ठेवावे. पाण्याची उपकरणे स्वच्छ, कोरडी ठेवावीत. लिटर नेहमी बदलावे, लहान पक्षी मोठ्या पक्ष्यांपासून दूर ठेवावेत.

प्रकाशन
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

### एकपेशीय परजीवी

आदिजीव जंतुमुळे मुख्यतः रक्ती हगवण (कॉक्सिडिओसिस) हा रोग होतो. कमी वयाची पिल्ले या रोगास बळी पडतात. रोगप्रसार ओले लिटर व दूषित पाण्यामुळे होतो. रोगाचे मुख्य लक्षण म्हणजे रक्तमिश्रित हगवण होणे, पंडुरोग, पंख गळून पडणे, भूक मंदावणे व कधी कधी पायांचा पक्षाघात होणे. या रोगावर शिफारशीत औषधे पक्ष्यांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने द्यावीत. सोबतीला 'क' जीवनसत्त्व द्यावे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून या रोगावर लसदेखील उपलब्ध आहे. गादी नेहमी कोरडी ठेवावी. गादीमध्ये चुन्याची पावडर मिसळावी. ही पावडर मिसळताना वर-खाली करून घ्यावी.

### बाह्यपरजीवी

उदा. माशा, गोचिडांच्या प्रादुर्भावामुळे पक्ष्यांचे अंग खाजते. पंडुरोग होतो. पंख गळून पडतात. गोचिडांमुळे स्पॉयरोकिटोसिस रोग होतो. नियंत्रणासाठी कीटकनाशके पशुवैद्यकांच्या सल्ल्याने वापरावी.

### बाह्यपरजीवींच्या नियंत्रणासाठी उपाययोजना

- पोल्ट्री शेडच्या लगतची झाडे, झुडपे काढून टाकावीत. किंवा त्यावर योग्य त्या मात्रामध्ये कीटकनाशके फवारावीत.
- कोंबडीच्या खुराड्यामध्ये ओलसर जागा ठेवू नये.
- सांडपाण्याची व्यवस्था नीट असावी. अडगळीच्या जागा बुजवून टाकाव्यात.
- लिटर कोरडे ठेवावे व नेहमी बदलत जावे. कोंबडीचे खुराडे, पक्षीघर स्वच्छ ठेवावे.




www.mafsu.in

www.knpcvs.in

✲ मार्गदर्शक ✲

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.